ला.प्र.वि.नंदुरबार
(कॅम्प–भुसावळ जि. जळगांव)
दिनांक ०५ /१०/२०२१.

:–प्रेस नोट :–

आलोसे १) श्रीमती प्रतिभा मच्छिंद्र लोहार, अव्वल कारकून, उपविभागीय कार्यालय, भुसावळ जि. जळगांव यांनी १०,०००/–रुपये लाचेची मागणी केली बाबत

| | |
|---|---|
| घटक | नंदुरबार |
| गुन्हा नोंद कमांक | भुसावळ शहर पोलीस स्टेशन गु.र.नं. १८८/२०२१ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | श्रीमती प्रतिभा मच्छिंद्र लोहार, अव्वल कारकून, उपविभागीय कार्यालय, भुसावळ जि. जळगांव |
| मगणी केलेली लाचेची रक्कम | १०,०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | निरंक |
| थोडक्यात माहिती | यातील मुळ तक्रारदार हे किराणा दुकानांत मजुरी काम करतात. मुळ तक्रारदार यांचे स्वत:चे भुसावळ नगरपालीका हद्दीत स.नं. ३५/२ प्लॉट नं.८ क्षेत्र ३०.२६५ चौरस मीटर असा प्लॉट असून सदर प्लॉट बिनशेती परवानगी मिळण्याकामी मा.उपविभागीय अधिकारी भुसावळ यांचे कार्यालयात प्लॉटचे सर्व कागदपत्र जोडून दिनांक ०२/०६/२०२१ रोजी अर्ज दिला होता. तक्रारदार यांचे काम वरील कार्यालयातील श्रीमती लोहार, अव्वल कारकुन यांचेकडे होते.<br>तक्रारदार हे श्रीमती लोहार यांना यापुर्वी भेटले असता त्यांनी तक्रारदार यांचेकडे १०,०००/– रूपये लाचेची मागणी करून तुमचे काम करून देईल असे सांगितले होते. परंतु मुळ तक्रारदार यांची त्यांना लाच दयावयाची मुळीच ईच्छा नसल्याने त्यांनी श्रीमती लोहार यांचेवर कायदेशीर कार्यवाही होणेकरीता लेखी तक्रार दिली होती.<br>त्याअनुषंगाने तक्रारदार यांना पडताळणीकामी मा.उपविभागीय अधिकारी, भुसावळ यांचे कार्यालयात श्रीमती लोहार यांचेकडे पंच साक्षीदारांसमक्ष पाठविले असता पडताळणी दरम्यान श्रीमती लोहार, अव्वल कारकून यांनी तक्रारदाराकडे कामासंबंधाने बोलणी दरम्यान १०,०००/– रुपये लाचेची मागणी केल्याने लागलीच यशस्वी सापळा कारवाई करण्याचे ठरवुन तक्रारदार यांना पुन्हा लाचेची मागणी केलेली रक्कम १०,०००/–रु. देणेसाठी पंच कमांक ०१ यांचेसोबत पाठविले असता त्यांनी लाचेची रक्कम स्विकारण्यास टाळाटाळ केली तरी लाचेची मागणी केली म्हणुन भुसावळ शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्या येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोवसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार कार्यालयास संपर्क करावा.

संपर्क पत्ता : ला.प्र.वि.नंदुरबार कार्यालय
संकेतस्थळ : acbnandurbar@gmail.com
ई–मेल : dyspacbnandurbar@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार/ॲप्लीकेशन : acbnandurbar@gmail.com
टोल फ्री कमांक : १०६४
दुरध्वनी कमांक : ०२५६४– २३०००९,२३१००९
व्हॉटस ॲप क. : ९५९४४०१७७७

(माधवी एस.वाघ)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नंदुरबार

Scanned with CamScanner